


हंस वुमेन्स फुटबॉल क्लब हा दिल्लीमध्ये झालेल्या स्टेट वुमन्स फुटबॉल लीग २०१६ च्या विजेता संघ.

# हंस महिला फुटबॉल क्लबला इंडियन वुमन लिगच्या पात्रता फेरीसाठी प्रायोजकत्व

कोल्हापूर : प्रतिनिधी :

देशाच्या राजधानीत महिला फुटबॉलला प्रोत्साहन देण्यात एंजेलिक फाऊंडेशनने महत्वाचा वाटा उचलला आहे. आपल्या या प्रयत्नांना मूर्त रूप देण्याचा प्रयत्न वुमन्स लिग क्वालिफायरच्या दुसर्या भागातही केला असून फाऊंडेशनने दिल्लीच्या वुमन्स स्पोर्टस क्लबला त्यांचे या पात्रता फेरीतील ध्येय गाठण्यासाठी प्रायोजकत्व दिले आहे.

एंजेलिक फाऊंडेशनच्या सीएसआर विभागप्रमुख जयश्री गोयल यांनी याविषयी बोलताना गेल्या काही वर्षापासून एंजेलिक फाऊंडेशनने मुलींच्या फुटबॉलला पाठिंबा दिला आहे. हंस वुमेन्स फुटबॉल क्लब हा दिल्लीमध्ये झालेल्या स्टेट वुमन्स फुटबॉल लीग २०१६ च्या विजेता संघ आहे हा देशव्यापी स्पर्धांमध्ये सहभागी होणारा दिल्लीचा पहिला संघ असणार आहे.